**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( साप्रवि), जिल्हा परिषद नाशिक यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम,2005 कलम 19(1) अन्वये दाखल झालेले प्रथम अपिलाचे कामकाज**

प्रथम अपील क्रमांक-
सामान्य प्रशासन विभाग

जा.क्र साप्रवि/आस्था-8/मासे/ २५० /19
नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
दिनांक २०/ ३ /2019

1.श्री. शेवाळे हेमंत दिनकर,
घर नं. 436 ,प-लॅाट नं.35 स्वामी विवेकानंद नगर,
अशोकं नगर,सातपुर,
नाशिक-422012

} अपिलार्थी ...

**--विरुध्द--**

1.श्री.रणजीत अरूण पगारे,
जन माहिती अधिकारी तथा
कनि.प्रशा. अधिकारी (साप्र) जि.प.नाशिक

} उत्तरवादी ...

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (1) नुसार प्रथम अपिल**

**-: विवेचन :-**

श्री. शेवाळे हेमंत दिनकर, घर नं. 436 ,प-लॅाट नं. 35 स्वामी विवेकानंद नगर, अशोक नगर ,सातपुर , नाशिक, 422012 अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडेस, 1) शासन निर्णय दि.21/9/2017 करिता आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे चा उल्लेख आहे. सर्व कागदपत्र म्हणजे कोणती कागदपत्रे व त्या सर्व कागदपत्राची यादि. 2) कुटुंब निवृत्ती वेतन मंजुरीचा आदेश अनुकंपा प्रस्तावा समवेत जोडण्यात आल्यानंतरच अनुकंपा प्रस्ताव परिपुर्ण होईल त्याचा शासन निर्णय. 3) कुटुंब निवृत्ती वेतन मंजुर नसल्यास अनुकंपा प्रस्ताव अपुर्ण ठेवावा या बाबतचा शासन निर्णय इ. दिनांक 24/12/2018 रोजीचा माहिती अधिकार अर्ज दिनांक 24/12/2018 रोजी कार्यालयास व दिनांक 27/12/2018 रोजी प्राप्त झाला होता.

अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे मुळ अर्जात नमुद माहिती ही साप्रवि आस्था-6 संकलनाशी निगडीत असल्याने व सदर मागणी केलेली माहिती उपलब्ध करून देणे करिता माहिती अधिकार मुळ अर्ज दिनांक 27/12/2018 अन्वये आस्था 6 संकलनाकडे वर्ग करण्यात आला होता.

अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आस्था 6 संकलनाकडे उपलब्ध आहे. त्याप्रमाणे जा.क्र.साप्रवि/आस्था 6/21/2019 दिनांक 11/1/2018 अन्वये आस्था- 6 संकलनाने कळविले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कळविण्यात आले होते. मात्र,अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक 11/1/2019 चे पत्रान्वये अनुसरून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 19 (1) नुसार दि.18/2/2019 रोजी प्रथम अपिल अर्ज या कार्यालयाकडे सादर केला.

अपिल अर्जाच्या अनुषंगाने दिनांक.6/3/2019 रोजी कार्यालयीन वेळेत सुनावणी अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद,नाशिक यांच्या दालनात ठेवण्यात आली. सदर सुनावणीस श्री.रणजीत पगारे, जन माहिती अधिकारी तथा कनि. प्रशा.अधिकारी (साप्र) जि.प.नाशिक, आस्था- 6 संकलनाचे श्रीम. सरला सोनार, क.सहा व श्री. किशोर पवार, क.सहा हे उपस्थित होते व अपील अर्जदार, श्री. शेवाळे हेमंत दिनकर हे उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिल अर्जदार यांना माहिती उपलब्ध करून दिली किंवा कसे याबाबत विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की अर्जदार अपिलार्थी यांनी, मागणी केलेली माहिती आस्था 6 संकलनाकडुन अर्जदार यांना व्यक्तीश: व पोष्टाने जा.क्र.साप्रवि/आस्था 6/21/2019 दिनांक 11/1/2019 या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तदनंतर जन माहिती अधिकारी व संबधीत संकलनाचे कर्मचारी व अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तीवादावरून मी प्रथम अपिलीय अधिकारी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

**-: निर्णय :-**

श्री. शेवाळे हेमंत दिनकर, अपिलार्थि यांचे दिनांक 24/12/2018 चे मुळ अर्जानुसारअपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीपैकि जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे अशा माहितीचे छायांकित प्रती जन माहिती अधिकारी यांनी आस्था-6 संकलना मार्फत अपिलार्थी यांना तात्काळ पुरविणेत यावी.

सदरचे अपिल निकाली काढणेत येत आहे.

**(प्रदिप चौधरी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)**
**जिल्हा परिषद,नाशिक**

**स्थळ - नाशिक**
**दि. ~~13 फेब्रुवारी 2019~~** 20/03/2019

**रजिष्टर पोस्टाने**

प्रति,

1.श्री. शेवाळे हेमंत दिनकर,घर नं. 436, प-लॅट नं. 35 स्वामी विवेकानंद नगर, अशोक नगर, सातपुर,नाशिक 422012

2.श्री.रणजीत अरूण पगारे,सहा. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (साप्रवि) जि.प.नाशिक

3.श्री.किशोर पवार, कनि. सहा. आस्था-6 साप्रवि, जि.प.नाशिक

---

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) नुसार व्दीतीय अपील करावयाचे असल्यास सदर आदेशाच्या दिनांकापासुन 90 दिवसांचे आत खालील पत्त्यावर अपिलीय अधिकारी यांचे कडेस अपील करता येईल.

मा.राज्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग,नाशिक खंडपिठ,
पिनॅकल मॉल,चौथा मजला,त्र्यंबकनाका सिग्नल जवळ,नाशिक
तालुका व जिल्हा नाशिक (महाराष्ट्र),दुरध्वनी क्रमांक (0253) 2232764